29 JAN 2024

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठासमोरील भुयारी मार्गास मुहूर्त

## दीड वर्षात काम पूर्ण करण्याची मुदत : अपघातांना बसणार आळा

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या पूर्व व पश्चिम भागास कायमस्वरूपी जोडणाऱ्या भुयारी मार्ग व सर्व्हिस रस्ता तयार करण्यासाठी ८ कोटी ४८ लाख ८१ हजार किमतीच्या या कामाची वर्कऑर्डर झाली असून, प्रत्यक्ष कामही सुरू झाले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे काम केले जात असून, कामाचा खर्च शिवाजी विद्यापीठ विकासनिधीतून केला जात आहे.

जुन्या पुणे-बंगळूर महामार्गामुळे शिवाजी विद्यापीठाचा विस्तीर्ण परिसर पूर्व व पश्चिम विभागाला आहे. या रस्त्याचे चौपदरीकरणाचे काम पूर्ण झाले असून, रस्तादुभाजकामुळे मुख्य



- विद्यार्थ्यांची सोय
- साडेआठ कोटींचा निधी

इमारत एकीकडे आणि विविध अधिविभाग दुसरीकडे अशी स्थिती झाली आहे.

विद्यापीठाच्या पश्चिम भागात मुख्य प्रशासकीय इमारत व विविध अधिविभागांच्या इमारती, क्रीडा संकुल इत्यादी इमारती आहेत. तर पूर्व भागात विद्यापीठाचा माहिती तंत्रज्ञान अधिविभाग, स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी, शाहू रिसर्च सेंटर, शिक्षणशास्त्र आदी अधिविभाग आहेत. तसेच पूर्व बाजूस यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट, जर्नालिझम व मासकम्युनिकेशन सेंटर, कन्व्हेंशन सेंटर इत्यादी इमारतीचे बांधकाम सुरू आहे.

### मार्ग सुकर होणार

या भुयारी मार्गामुळे शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य इमारत परिसरातून समोर असणाऱ्या विविध अधिविभागाकडे जाण्याचा मार्ग सुकर होणार आहे. तसेच भुयारी मार्गामुळे या परिसरातील अपघातांना आळा बसणार आहे.

या मुख्य रस्त्यावरून विद्यापीठातील विद्यार्थी, शिक्षक अशा सुमारे २ हजार ते ३ हजार नागरिकांची दररोज ये-जा सुरू असते. दरम्यान, या रस्त्यावर पुणे-बंगळूर राष्ट्रीय महामार्गावरून शहरात येणाऱ्या-जाणाऱ्या वाहनांची संख्याही मोठी आहे. प्रचंड वर्दळीमुळे नागरिकांना हा रस्ता ओलांडणे जीवघेणे ठरत आहे. या ठिकाणी अनेकदा लहान-मोठे अपघात घडले आहेत. त्यामुळे विद्यापीठाने भुयारी मार्ग व सर्व्हिस रस्त्यासाठी ८ कोटी ४८ लाख ८१ हजार रुपयांचे अंदाजपत्रक केले. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य अभियंत्यांनी तांत्रिक मान्यता देऊन या प्रस्तावास राज्य शासनाने मान्यता दिली.

वर्कऑर्डर निघाल्याने या कामावर अखेर शिक्कामोर्तब झाले असून, प्रत्यक्ष कामासही सुरुवात झाली आहे. दीड वर्षात काम पूर्ण करण्याची मुदत आहे. भुयारी मार्गामुळे विद्यार्थ्यांची चांगली सोय होणार आहे. तसेच लहानमोठ्या अपघातांना आळा बसण्यास मदत होणार आहे.

29 JAN 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठातर्फे परीक्षांसाठी ऑनलाईन अर्ज प्रक्रिया सुरू

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने मार्च-एप्रिल २०२४ मध्ये होणाऱ्या उन्हाळी सत्रातील परीक्षांसाठी अर्जाची ऑनलाईन प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यानुसार विनाविलंब शुल्कासह ७ फेब्रुवारीपर्यंत ऑनलाईन अर्ज करता येणार आहे. अतिविलंब शुल्कासह २० फेब्रुवारीपर्यंत अर्ज करता येईल.

महाविद्यालय, अधिविभागांनी परीक्षा अर्ज ८ फेब्रुवारीपर्यंत अप्रुव्ह करायचे आहेत. सर्व परीक्षांच्या याद्या १२ फेब्रुवारीपर्यंत जमा करावयाच्या आहेत. याबाबतची माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी महाविद्यालय, अधिविभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.

29 JAN 2024

पुढारी

# विद्यापीठातर्फे आयोजित महिला मार्गदर्शन मेळाव्याला प्रतिसाद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

प्रजासत्ताक दिनानिमित्त सावंतवाडी (ता. करवीर) येथे शिवाजी विद्यापीठाच्या समाजकार्य विभागाच्या वतीने महिला मार्गदर्शन मेळावा घेण्यात आला. या मेळाव्याला परिसरातील महिलांचा प्रतिसाद लाभला.

यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून शिवाजी विद्यापीठ समाजकार्य विभागाच्या सहायक प्रा. डॉ. ऊर्मिला दशवंत, पंचायत समिती करवीर उमेद अभियानाच्या प्रभाग समन्वयक पूजा शिंदे उपस्थित होत्या. त्यांनी बचत गटाविषयी मार्गदर्शन केले.

विद्यामंदिर सावंतवाडीचे मुख्याध्यापक अर्जुन तांदळे, सहायक शिक्षक दीपक दगडखैर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष जगन्नाथ सावंत आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संयोजन स्वप्निल बारवाडे, प्रेम भोसले, क्रांती कोलप, सारिका पाटील यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 JAN 2024
सकाळ

# नॅनोसायन्स विभागाचे पालकांकडून कौतुक

कोल्हापूर, ता. २८ : शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनोसायन्स अॅन्ड बायोटेक्नॉलॉजीच्या कामगिरीचे पालकांनी कौतुक केले. या अधिविभागातर्फे पालक मेळावा घेण्यात आला. मेळाव्यात डॉ. के. के. शर्मा, के. व्ही. खोत, के. डी. पवार, वाय. वाय. पाटील, एस. ए. सावंत, एम. एन. पाडवी, पी. जे. पाटील यांनी अधिविभागाच्या शैक्षणिक आणि विद्यार्थीकेंद्रीत उपक्रमांचा, संशोधन, उपलब्ध सुविधा, नोकरीच्या संधी, परीक्षा, शिष्यवृत्ती, प्रवेश प्रक्रियेची माहिती दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 JAN 2024
तरुण भारत

# रशियन भाषेत प्रियांका माळकर नेट परीक्षा उत्तीर्ण



**कोल्हापूर :** विद्यापीठ अनुदान आयोगातर्फे घेण्यात आलेल्या 'नेट' डिसेंबर २०२३ या परीक्षेत प्रियांका माळकर यांनी रशियन भाषेत नेट परीक्षा उत्तीर्ण झाल्या आहेत. ३०० पैकी १७२ गुण मिळवून त्या गुणवत्ता यादीत प्रथम क्रमांक मिळवला. शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागात सहयोगी प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. माळकर यांनी याच विद्यापीठातील विदेशी भाषा विभागात रशियन भाषा प्रमाणपत्र अभ्यासक्रमापासून सुरुवात करून एम. ए. पदवी प्राप्त केली. आता त्या नेट परीक्षा उत्तीर्ण झाल्या आहेत. या यशाबद्दल विदेशी भाषा विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे यांनी पुष्पगुच्छ देवून त्यांचे अभिनंदन केले.